प्रसिध्दी पत्रक

दिनांक:-०८/०२/२०२१

**शाहुराज दत्तु भोजगुडे, वय ५४, मुख्याध्यापक, गांधी विदयालय चिखली, ता.जि. उस्मानाबाद यांनी १०००/- रुपये लाच रक्कम स्विकारल्याने लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, उस्मानाबादच्या जाळयात**

| | |
|---|---|
| आरोपी लोकसेवकाचे नाव, हुद्दा व पत्ता | शाहुराज दत्तु भोजगुडे, वय ५४, मुख्याध्यापक, गांधी विदयालय चिखली, ता.जि. उस्मानाबाद |
| गुन्हयाचा दिनांक व ठिकाण | दि.०८.०२.२०२१ रोजी गांधी विदयालय चिखली, उस्मानाबाद येथील मुख्याध्यापक श्री . भोजगुडे यांच्या कार्यालयात |
| तपासी अधिकारी | श्री.प्रशांत संपते, पोलीस उप अधीक्षक, ला.प्र.विभाग, उस्मानाबाद |
| लाचेची रक्कम मागणी | १०००/- रुपये |
| लाच मागण्याचा हेतु | तक्रारदार यांचे DCPS ( परिभाषीक अंशदान निवत्ती योजना ) NPS ( केंद्रीय राष्ट्रीय निवत्ती योजना) मध्ये वर्ग करण्यासाठी त्याची मुळ फाईल मा.अधिक्षक, वेतन अणि भविष्य निर्वाह निधी पथक, उस्मानाबाद यांचेकडे दाखल करण्यासाठी मुख्याध्यापक भोजगुडे यांनी तक्रारदार यांचेकडे १०००/- रुपये लाचेची मागणी करुन १०००/- रुपये लाच रक्कम पंचासमक्ष गांधी विदयालय , चिखली येथील त्यांचे कार्यालयात स्वत: स्विकारली. |

यातील तक्रारदार गांधी विदयालय सहशिक्षीक असुन तक्रारदार यांचे यांचे DCPS ( परिभाषीक अंशदान निवत्ती योजना ) NPS ( केंद्रीय राष्ट्रीय निवत्ती योजना) मध्ये वर्ग करण्यासाठी त्याची मुळ फाईल मा.अधिक्षक, वेतन अणि भविष्य निर्वाह निधी पथक, उस्मानाबाद यांचेकडे दाखल करण्यासाठी मुख्याध्यापक भोजगुडे यांनी तक्रारदार यांचेकडे १०००/- रुपये लाचेची मागणी करुन १०००/- रुपये लाच रक्कम पंचासमक्ष गांधी विदयालय, चिखली येथील त्यांचे कार्यालयात स्वत: स्विकारली.

तक्रारदार यांनी दिलेल्या तक्रारीचे अनुषंगाने दि.०८.०२.२०२१ रोजी भोजगुडे मुख्याध्यापक यांची गाधी विदयालय ,चिखली, ता.जि. उस्मानाबाद येथील कार्यालयात लाच मागणी पडताळणी केली असता त्यांनी तक्रारदार यांचेकडे नमुद कामासाठी १०००/- रु लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले.

त्यावरुन लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, उस्मानाबाद तर्फे आज दि.०८.०२.२०२१ रोजी सापळा आयोजीत केला असता गांधी विदयालय चिखली , उस्मानाबाद येथील मुख्याध्यापक कार्यालयात भोजगुडे यांनी तक्रारदार यांच्याकडुन लाचेच्या मागणीप्रमाणे १०००/- रुपये लाच रक्कम स्विकारल्यानंतर त्यांना रंगेहाथ पकडण्यात आले. यावरुन त्यांचेविरुध्द पोलीस ठाणे बेबंळी, उस्मानाबाद येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु आहे.

सदर कारवाई मा. पोलीस अधीक्षक डॉ.राहुल खाडे, मा.अपर पोलीस अधीक्षक डॉ.अनिता जमादार, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग औरंगाबाद, यांच्या मार्गदर्शनाखाली श्री.प्रशांत संपते, पोलीस उप अधिक्षक यांनी केली असुन सदर कारवाईस पोह/शेख,पोहा/उगलमुगले, पोना/जाधव, पोना/ मारकड, पोकॉ/बेळे,पोकॉ/तावसकर, चालक/करडे यांनी मदत केली आहे.

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, उस्मानाबाद तर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, कोणताही शासकीय अधिकारी/कर्मचारी १) महाराष्ट्र शासनाचे मानधन, अनुदान घेणारी व्यक्ती २) खाजगी इसम शासकिय कामाकरिता अथवा शासकीय काम करुन दिले बद्दल लाचेची मागणी करीत असतील तर कृपया खालील मोबाईल, दूरध्वनीवर, टोल फ्री क्रमांकावर, लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे मोबाईल ॲप्सद्वारे www.acbmaharashtra.net या संकेतस्थळावर तक्रारी नोंदविण्यासाठी संपर्क साधावा.

**मोबाईल क्रमांक :-**

१) मा.डॉ.राहुल खाडे, पोलीस अधीक्षक, ला.प्र.विभाग, औरंगाबाद मोबाईल क्रं. ८८८८८०७२९९
२) श्री.प्रशांत संपते, पोलीस उप अधीक्षक, ला.प्र.विभाग, उस्मानाबाद मो.नं. ९५२७९४३१००
३) टोल फ्री क्र. १०६४, दूरध्वनी क्र:.- ०२४७२-२२२८७९
E-Mail ID:- dysposmanabad@gmail.com

**(प्रशांत संपते)**
**पोलीस उप अधीक्षक**
**ॲन्टी करप्शन,ब्युरो,उस्मानाबाद**

Scanned with CamScanner